।। बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।।

४० वर्षापासून नियमितपणे प्रकाशित होणारे जनसामान्यांच्या प्रश्नांचा ध्यास असणारे एकमेव निर्भिड...

साप्ताहिक

# माणदेश वार्ता

संस्थापक संपादक :
स्व.मारुती शिवाजी सोनवणे (एम.ए.)

स्थापना
६ नोव्हेंबर १९८३

RNI NO.
MAH/MAR/2004/16467

POSTAL REGD.
L2/RNP/PPR/04/2024-2026

FACEBOOK
MANDESH VARTA

सांगोला * जुने वर्ष ४१ वे नवीन वर्ष २१ वे * रविवार दि. १४ एप्रिल २०२४ * पाने ४ * मूल्य १ ₹ * अंक १४ वा

## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव सोहळ्यास सांगोला येथे उत्साहात प्रारंभ

सांगोला: डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मंडळ भिमनगर सांगोला यांच्या वतीने सांगोला येथे आयोजित करण्यात आलेल्या विश्वरत्न, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंती उत्सव सोहळ्यास सांगोला येथे मोठ्या उत्साही वातावरणात प्रारंभ झाला.

काल शनिवार दि.१३ एप्रिल रोजी रात्री १२ वा.भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व अर्धपुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्याचा कार्यक्रम तहसीलदार श्री.संतोष कणसे, पोलीस निरीक्षक श्री.भिमराव खणदाळे आणि मुख्याधिकारी डॉ.सुधीर गवळी यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. यावेळी १४ तोफांची निळी सलामी देण्यात आली. यावेळी मंडळाचे अध्यक्ष, उपाध्यक्षा, खजिनदार, सेक्रेटरी, सहसेक्रेटरी, संचालक मंडळातील सदस्यांसह बौद्ध बांधव, भिमसैनिक, बहुजन बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आज रविवार दि.१४ एप्रिल रोजी जयंती उत्सव मंडळाच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ९ वा.सांगोला शहरातून भव्य प्रभात फेरी, सकाळी ९.३० वाजता समता सैनिक दलाचे संचलन व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैलचित्रास व धम्म ध्वजास मानवंदना, सकाळी १० वाजता भिमनगर मधील जयंती उत्सव मंडपातील सिंहासनस्थ पुतळ्याचे पूजन व पंचशील ध्वजारोहण, सकाळी १०.३० वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर अर्धपुतळ्यास सामुदायिक पुष्पहार अर्पण करण्यात येणार आहे. यावेळी आ.शहाजीबापू पाटील, माजी आम.दिपकआबा साळुंखेपाटील, डॉ.बाबासाहेब देशमुख, डॉ.प्रभाकर माळी यांच्यासह सांगोला शहरातील आजी-माजी नगराध्यक्ष, नगरसेवक, सांगोला शहर व तालुक्यातील विविध राजकीय पक्षाचे व संघटनांचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या सिंहासनस्थ पुतळ्याचे व प्रतिमेचे भव्य मिरवणूक दुपारी ४ वाजता सांगोला शहरातून काढण्यात येणार आहे. या भव्य मिरवणुकीचे उद्घाटन माजी नगराध्यक्ष प्रा.पी.सी.झपके, श्री.ताजुद्दीन कुरेशी, मोहिद्दीन कुरेशी, श्री.हसन कुरेशी व श्री.खाजाभाई कुरेशी यांच्या शुभहस्ते होणार आहे.

तरी वरील सर्व कार्यक्रमास सांगोला शहर व तालुक्यातील बौध्द बांधव, भिमसैनिक, बहुजन बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मंडळाच्यावतीने करण्यात आले आहे.

## शेतकरी कामगार पक्षाचे नेते बाबासाहेब करांडे यांचे निधन




सांगोला : सोलापूर जिल्हा परिषदेचे माजी सदस्य व शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते बाबासाहेब करांडे यांचे काल शनिवार दि.१३ एप्रिल रोजी पहाटे ६.५० मिनिटांनी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर आज दुपारी सातारकर वस्ती लोटवाडी ता.सांगोला येथे सांय. ६.३० वाजण्याच्या सुमारास अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी दिपकआबा साळुंखेपाटील, चंद्रकांतदादा देशमुख, चेतनसिंह केदार-सावंत, डॉ.बाबासाहेब देशमुख, डॉ.अनिकेत देशमुख, शिवसेनेचे सागर पाटील यांच्यासह माजी जिल्हा परिषद सदस्य, जिल्हा परिषद मधील कर्मचारी, अधिकारी, राजकीय पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. पायाला गँगरीन झाल्याने त्यांच्यावर पुणे येथे उपचार सुरू होते या उपचारा दरम्यानच त्यांचा मृत्यू झाला आहे.

बाबा करांडे हे २००७ ते २०१२ दरम्यान जिल्हा परिषदेचे सदस्य होते, यापूर्वी सलग पाच वर्ष ते लेबर फेडरेशनचे चेअरमन राहिले होते. सध्या ते लेबर फेडरेशनवर संचालक होते. सोलापूर जिल्ह्यातील कर्मचारी चळवळीचे नेते म्हणून त्यांची ओळख होती. जिल्हा परिषद चालक यांच्या विविध प्रश्नावर त्यांनी आवाज उठवला होता. सोलापूर जिल्हा वाहन चालक संघटनेचे अध्यक्ष होते त्यानंतर राज्याचे वाहन चालक संघटनेचे अध्यक्ष झाले तर नंतर सोलापूर जिल्हा परिषद मध्यवर्ती कर्मचारी संघटना सर्व संघटनांची समन्वय समिती स्थापन केली.

पतसंस्था क्रमांक दोनचे मार्गदर्शक मोलमजुरांसाठी स्वतंत्र पतसंस्था स्थापन केली नंतर त्याचे रूपांतर पतसंस्था क्रमांक तीन मध्ये करण्यात आले. कर्मचाऱ्यांच्या वर अन्याय झाल्यानंतर वेळोवेळी अत्यंत कडक शब्दात प्रशासनाबरोबर प्रखर विरोध करून कर्मचाऱ्यांना न्याय देण्याची भूमिका त्यांची असायची.

आजपर्यंत त्यांनी डॅ.गणपतराव देशमुख शेतकरी सहकारी सूतगिरणी सांगोलाचे संचालक, सोलापूर जिल्हा लेबर फेडरेशनचे माजी चेअरमन व शेकाप पक्ष चिटणीस मंडळाचे सदस्य म्हणून काम पहिले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे. तिसरा दिवस विधी उद्या सोमवार दि.१५ मार्च रोजी सकाळी ७ वाजता सातारकरवस्ती, लोटेवाडी येथे होणार असल्याचे त्यांच्या नातेवाईकांनी सांगितले.



# आधुनिक भारताचे निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर

स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री, भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतीय न्यायशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, राजनीतिज्ञ, तत्त्वज्ञ, समाजसुधारक, पत्रकार, वकील, दलित बौद्ध चळवळीचे प्रेरणास्थान आणि भारतीय बौद्ध धर्माचे पुनरुज्जीवक महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आज जयंती. १४ एप्रिल १८९१ रोजी बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म झाला. प्रचंड बुद्धिमत्ता, समाजासाठी असीम त्याग करणारे, दलित समाजाला हक्क मिळवून देणारे, महाडचा सत्याग्रह, मनुस्मृतीचे दहन, मंदिर सत्याग्रह, शेतकऱ्यांचा कैवारी, गोलमेज परिषद, पुणे करार, स्वतंत्र मजूर पक्ष, बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना, दलित शिक्षण संस्थेची स्थापना, पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना, महिलांसाठी कार्य, स्वातंत्र्य लढ्यात सहभाग अशा कितीतरी गोष्टी बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या जीवनात केल्या. समाजासाठी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घातले. समाजामधील तळागाळातील व्यक्तींचा प्रामुख्याने विचार केला. शिक्षणासाठी, समाजाच्या कल्याणासाठी आयुष्यभर संघर्ष केला. शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा, असा गुरुमंत्र दिला. असामान्य कर्तृत्व गाजवणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त त्यांच्या चरित्राचा अगदी थोडक्यात आढावा...



**प्रारंभीचा काळ:**

मध्य प्रदेशातील महू येथे बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म झाला. बाबासाहेबांच्या वडिलांचे नाव रामजी आणि आईचे नाव भीमाबाई असे होते. मध्य प्रदेशानंतर काही काळ दापोली, सातारा असे वास्तव्य करीत आंबेडकरांचे कुटुंब मुंबईत राहण्यास आले. बाबासाहेबांनी सुरुवातीचे शिक्षण मुंबईतील सरकारी शाळेत घेतले. बाबासाहेबांनी शिक्षण घेण्यासाठी खूप कष्ट सोसले. वयाच्या १४-१५ वर्षी बाबासाहेब आंबेडकर यांचा विवाह दापोली येथील भिकू वलंगकर यांच्या मुलीशी म्हणजेच रमाबाई यांच्याशी झाला. बाबासाहेब आपल्या शालेय जीवनात १८ तास अभ्यास करत असत.

**उच्च शिक्षण :**

मॅट्रिकची परीक्षा यशस्वीपणे उत्तीर्ण झाल्यानंतर बाबासाहेबांनी मुंबई विद्यापीठातून बी.ए. ची पदवी घेतली. बडोदा संस्थानाचे सयाजीराव गायकवाड यांच्या मदतीने बाबासाहेब उच्च शिक्षणासाठी अमेरिकेत गेले. कोलंबिया विद्यापीठातून अर्थशास्त्र विषयात एम.ए.ची पदवी संपादन केली. त्यानंतर याच विषयात डॉक्टरेट मिळवली. परदेशातील विद्यापीठातून अर्थशास्त्रात पदवी संपादन करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पहिले भारतीय होते. बाबासाहेबांनी दोन विषयात एम.ए. केले. दोन विषयात पीएच.डी. मिळवली. बार-ॲट-लॉ आणि डी. एससी पदवी घेतली. ग्रेज इन येथून बॅरिस्टर-ॲट-लॉ ही पदवी घेऊन ३ एप्रिल १९२३ रोजी मुंबईत परतले. समाजकार्य करावे व अर्थार्जनासाठी वकिली करावी असा निर्णय त्यांनी घेतला. सुरुवातीच्या काळात बाबासाहेबांनी उत्तम प्रकारे वकिली केली.

**सत्याग्रह :**

सन १९२० मध्ये बाबासाहेबांनी मूकनायक नावाचे वृत्तपत्र सुरू केले. संपूर्ण देशात बहुसंख्य ठिकाणी अस्पृश्यांना सार्वजनिक पाणवठ्यावर पाणी भरण्याचा किंवा पिण्याचा अधिकार नव्हता. त्यामुळेच अस्पृश्यांना त्यांचा हक्क मिळवून देण्यासाठी बाबासाहेबांनी महाड येथे पिण्याच्या पाण्यासाठी सत्याग्रह करण्याचे ठरवले. बाबासाहेब आंबेडकरांनी २० जुलै १९२४ रोजी मुंबई येथे 'बहिष्कृत हितकारिणी सभे'ची स्थापना केली. सामाजिक व राजकीयदृष्ट्या तळागाळात फेकल्या गेलेल्यांना भारतीय समाजातील इतरांच्या बरोबर आणणे, हे ह्या सभेचे ध्येय होते. हिंदू असूनही हिंदूच्या मंदिरात प्रवेश मिळत नसल्यामुळे तो समानतेचा अधिकार मिळवण्यासाठी अमरावती येथील प्राचीन अंबाबाई मंदिरात, पुण्यातील पर्वती मंदिरात, नाशिक येथील काळाराम मंदिरात बाबासाहेबांनी मंदिर सत्याग्रह केला.

**शेतकऱ्यांसाठी कार्य :**

शेतीला उद्योग मानून पायाभूत सुविधा पुरवून शेतकऱ्यांचा आर्थिक विकास झाला पाहिजे. आर्थिक स्रोत तळागाळापर्यंत झिरपले म्हणजे ग्रामीण माणसाच्या मानसिकतेत सकारात्मक बदल घडतील. आर्थिक विषमता जितकी कमी होईल, तितकी जातीय भेदभावाची दरी कमी होईल, असे बाबासाहेबांना वाटत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्वांत महत्त्वाची संकल्पना मांडली ती 'शेतीचे राष्ट्रीयकरण' करण्याची. पीकपद्धती, पाणी उपलब्धता, बांधबंदिस्ती, उत्पादकता वाढ, साठवण व्यवस्था, शेतमालाची विक्री, शेतमालाचे भाव या संदर्भात स्पष्ट नियम करावेत, असे त्यांचे स्पष्ट मत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या काही संकल्पनातूनच कमाल जमीनधारणा कायदा, सावकारी व खोती पद्धतींना प्रतिबंध करणारा कायदा, सामूहिक शेतीचे प्रणालीवर आधारित शेती महामंडळ, राज्यातील नद्यांच्या खोऱ्यांची विभागणी व विकास, जलसंवर्धन योजना अमलात आल्या. शासनाने त्याबाबत कायदे व नियम बनविले. यामागे डॉ. बाबासाहेब यांच्या विचारांचाच प्रभाव दिसून येतो.

**असामान्य कर्तृत्व :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर समग्र पीडित, शोषित व दलितांचे प्रतिनिधी म्हणून लंडनच्या तिन्हीही गोलमेज परिषदांना हजर राहिले. स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेत अस्पृश्यांचे हितसंरक्षण करण्याच्या हेतूने त्यांनी इंडियन राऊंटेबल कॉन्फरन्सला मागण्या सादर केल्या. इ.स. १९२० च्या दशकाच्या अखेरीस डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलितांचे राजकीय नेते बनले होते. इ.स. १९३२ रोजी ब्रिटिश मंत्रिमंडळाने पुणे करार मंजूर करून घेतला. त्यावर मंत्रिमंडळाने शिक्कामोर्तब केले. मजुरांना, कामगारांना हक्क व अधिकार मिळवून देण्यासाठी इ.स. १९३६ मध्ये त्यांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना, दलित शिक्षणसंस्थेची स्थापना, पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना करून शिक्षणाची दारे खुली केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्त्रीमुक्तीचे पक्के समर्थक होते. त्यांच्यावर तथागत गौतम बुद्धांच्या शिकवणुकीचा आणि महात्मा जोतिबा फुलेंच्या कार्याचा प्रभाव होता. ते स्त्री शिक्षणाचे पुरस्कर्ते होते. स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री असलेल्या बाबासाहेब आंबेडकरांचा भारतीय संविधानात सिंहाचा वाटा होता. एवढे सूक्ष्म निरीक्षण असणारे आणि कोणावरही अन्याय न करता सर्वांना समान हक्क, अधिकार देणाऱ्या बाबासाहेबांच्या असामान्य बुद्धीची प्रचिती संविधानाच्या वाचनावरून, तरतुदींवरून येतेच.

**धर्मांतराची घोषणा :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे कोट्यवधी दलितांना सामाजिक न्याय मिळवून देण्यासाठी दिवसरात्र झटत होते. हिंदू धर्मात आपल्याला समतेची वागणूक देण्यात यावी यासाठी त्यांनी मोठा लढा दिला. शेवटी हिंदू धर्म त्यागाचा म्हणजेच धर्मांतराचा निर्णय घेतला. हिंदू धर्माचा त्याग केल्यानंतर कोणत्या धर्माचा स्वीकार करायचा, याबद्दल बाबासाहेबांनी सखोल विचार केला. हजारो कार्यकर्ते आणि अनुयायांचा बाबासाहेबांना पाठिंबा होता. अखेर बौद्ध धर्माचा बाबासाहेब आंबेडकरांनी स्वीकार केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली २ मे १९५० रोजी भारतात पहिली सार्वजनिक बुद्ध जयंती दिल्ली येथे साजरी झाली. या जयंती समारोहास अनेक देशांचे वकील/प्रतिनिधी, भिक्खू समुदाय व सुमारे वीस हजार लोकांचा समुदायही उपस्थित होता. मार्च १९५९ च्या एका अहवालानुसार देशात १.५ ते २ कोटी अस्पृश्यांनी बौद्ध धर्म स्वीकारला होता. या घटनेची जागतिक इतिहासात नोंद झाली तर या घटनेने भारतात बौद्ध धर्म पुनर्जीवित झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर जगात ऐतिहासिक होते. कारण ते जगातील सर्वात मोठे सामूहिक धर्मांतर होते.

*******

माणदेश वार्ता हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक सोनवणे रोहित मारूती यांनी मुद्रक माळी अशोक बाळकृष्ण यांच्या बाळकृष्ण ऑफसेट प्रिंटर्स,नेहरू चौक, कोर्टा जवळ, सांगोला, जि. सोलापूर येथे छापून १२७९ अ भारत गल्ली, सांगोला, जि.सोलापूर येथे प्रसिद्ध केले. E-Mail- mandesh_varta@rediffmail.com
संपादक : सोनवणे रोहित मारूती (या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) .*जुने वर्ष-४१ वे * अंक-२१ वा मो. ९४२०६६६५०१, ९०२८५९१४३१

# शिरभावी नळ पाणीपुरवठा योजनेतून ३२ गावांना ३० लाख लिटर पाणीपुरवठा

## सांगोला तालुक्यात ११ टँकरने २० खेपा करून पिण्याचे पाणी वाटप

सांगोला : सांगोला तालुक्याच्या पिण्याच्या पाण्याची वरदायिनी असणाऱ्या एकमेव शिरभावी प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेतून ८२ पैकी ३२ गावांना त्यांच्या मागणीनुसार दीड लाख लोकसंख्येला व ४ सहकारी संस्थांना सरासरी ३० लाख लिटर पाणीपुरवठा सुरू आहे तर शिरभावी योजनेतून १० टँकरद्वारे २० खेपा करून वाडीवस्तीवरील नागरिकांची तहान भागवली जात आहे.

१२ ग्रामपंचायतीकडून शिरभावी योजनेकडे पाणीपुरवठा करण्याची मागणी केली आहे.दरम्यान मार्च २०२४ अखेर योजनेतील थकबाकीदार गावे व संस्थाकडे सुमारे १ कोटी ३१ लाख ६३ हजार रुपये थकबाकी येणे असल्याचे उपविभागीय अधिकारी ज्ञानेश्वर माने यांनी सांगितले.

चालू वर्षी कमी पर्जन्यमान व भीषण दुष्काळी परिस्थितीमुळे सांगोला तालुक्यातील गाव पातळीवरील सर्व योजनांच्या विहिरी कोरड्या पडू लागल्यात तर भूजल पातळी खोलवर गेल्यामुळे गाव, वाड्या वस्त्यांवर पिण्याच्या पाण्याची भिषण टंचाई निर्माण होऊ लागली आहे अशातच ग्रामपंचायतीकडील ग्रामीण पाणीपुरवठा योजनाही पाण्याविना बंद पडू लागल्याने पिण्याच्या पाण्यासाठी एकमेव आधार असलेल्या ८२ गावांच्या शिरभावी प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनकडे पिण्याच्या पाणीपुरवठ्यासाठी दिवसेंदिवस मागणीत वाढ होत आहे.

शिरभावी प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेतून – मानेगाव, डोंगरगाव , लक्ष्मीनगर, घेरडी, बामणी, सावे, देवळे मांजरी, धायटी, गोडसेवाडी, जवळा ,बुरंगेवाडी, सोनंद हणमंतगाव, अजनाळे, संगेवाडी, मेथवडे, कटफळ, वाकी शिवणे ,नरळेवस्ती, आचकदाणी, सोनलवाडी बागलवाडी, महूद बुद्रुक, वाणीचिंचाळे, आलेगाव, मेडशिंगी, लोटेवाडी सातारकरवस्ती, वाकी–घेरडी, कडलास आगलावेवाडी, यलमर मंगेवाडी अशा ३२ गावातील दीड लाख लोकसंख्येला त्यांच्या मागणीनुसार पाणीपुरवठा सुरू आहे.

तालुक्यातील कोळे, महीम, खिलारवाडी, चिंचोली ,चिकमहुद, इटकी, नाझरे सोमेवाडी, कमलापूर, तरंगेवाडी, भोपसेवाडी, गायगव्हाण अशा १२ गावांची पाणीपुरवठा करण्याची मागणी आली आहे.


तसेच लोटेवाडी, कटफळ, अचकदाणी ,बागलवाडी, सोनलवाडी, चिकमहूद, अजनाळे, डोंगरगाव, यलमर मंगेवाडी या गावांतर्गत वाड्या वस्त्यांवर शिरभावी योजनेतील मुख्य टँक मधून ११ टँकरने २० खेपा करून पिण्याचे पाणी दिले जात आहे.

# सांगोला येथील अंबिकादेवी वाचनालय माणदेश राज्यस्तरिय ग्रंथरत्न पुरस्काराने सन्मानित



सांगोला : अंबिकादेवी सार्वजनिक वाचनालय सांगोला यास कै.दमयंती डिकसळकर सार्वजनिक वाचनालय बामणी यांचे रौप्य महोत्सवी वर्षातील कार्यक्रमात मान्यवरांच्या उपस्थितीत राज्यस्तरीय माणदेश ग्रंथरत्न पुरस्कार देऊन त्यांना सन्मानपत्र शिल्ड मेडल ग्रंथ देऊन गौरविण्यात आले. पुरस्कार वाचनालयाचे अध्यक्ष डॉ.मच्छिंद्र सोनलकर, ग्रंथपाल अमर कुलकर्णी यांना मान्यवरांचे हस्ते प्रदान करण्यात आला.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी बामणी गावचे विद्यमान सरपंच शालन चव्हाण व प्रमुख पाहुणे सांगोला सुतगिरणीचे मा.चेअरमन प्रा.नानासाहेब लिगाडे उपस्थित होते. यावेळी वाचनालयाचे अध्यक्षा सौ.संगिता डिकसळकर, ग्रंथालय अधिकारी कार्यालयातील निरिक्षक प्रमोद पाटील , ग्रंथमित्र कुंडलिक मोरे ,महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे संचालक ग्रंथमित्र गुलाबराव पाटील मा.उपसभापती राजाराम येलपले जिल्हा संघाचे अध्यक्ष ग्रंथमित्र विजयकुमार पवार , उपाध्यक्ष पांडूरंग सुरवसे , प्रमुखकार्यवाह साहेबराव शिंदे , सहसचिव अन्सर शेख ,संचालक विलास कदम –पाटील सौ.सारिका मोरे ,सौ.वृशाली हजारे ,सौ.छाया मोरे, सौ.राजश्री हाके, सौ.स्वाती कदम आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी ग्रंथमित्र कुंडलिक मोरे यांची डिजिटल ग्रंथतुला करण्यात आली. प्रास्ताविक व स्वागत वाचनालयाचे सर्वेसर्वा जितेंद्र डिकसळकर यांनी केले. आभार व सूत्रसंचालन प्रा.कामदेव खरात यांनी केले. कार्यक्रमास मोठ्या संख्येने ग्रंथालय क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थिती लावली होती. ग्रंथालय कर्मचारी संचालकमंडळ व तेजस डिकसळकर यांनी कार्यक्रम यशस्वी होणेसाठी परिश्रम घेतले.

निर्भिड व सडेतोड बातम्या
नियमित वाचा....
साप्ताहिक माणदेश वार्ता



# सांगोल्याच्या महुद रस्त्या लगतच्या हॉटेल-लॉज मध्ये बिनदिक्कतपणे "सेक्स रॅकेट"

## सेक्स रॅकेटवर अनैतिक व्यापार प्रतिबंध कायद्याद्वारे कारवाई करण्याची मागणी

सांगोला :सांगोला शहराच्या महूद रस्त्या लगत असलेल्या हॉटेल वजा लॉज मध्ये पुणे–मुंबई येथील मुलींच्या माध्यमातून सेक्स रॅकेट बिनदिक्कत पणे सुरू असल्याची जोरदार चर्चा सध्या सांगोला शहर व तालुक्यात आहे. महूद रोडच्या लगत असलेल्या या हॉटेल–लॉज मध्ये गेल्या काही वर्षापासून अगदी कोरोना काळात ही मोठ्या प्रमाणात सेक्स रॅकेट चालू असल्याची कुजबूज सुरू होती. सदरील सेक्स रॅकेट हे मुंबई–पुणे येथील मुलींच्या माध्यमातून सुरू असल्याचे बोलले जात आहे. या सेक्स रॅकेट वर सांगोला पोलिसांनी अनैतिक व्यापार प्रतिबंध कायद्याद्वारे तात्काळ कार्यवाही करावी अशी मागणी

सदरचे सेक्स रॅकेट हे पूर्णत: मोबाईल वरती कार्यरत असून या सेक्स रॅकेट वरती कारवाई करण्याचे धाडस सांगोल्याचे पोलीस करणार का? अशीही चर्चा या निमित्ताने सांगोला शहर व तालुक्यात सुरू आहे.






सेक्स रॅकेट चालवण्यासाठी सदरील मुली मुंबई–पुणे येथून नियमितपणे सांगोला येथे ये– जा करीत असून सांगोला शहर व तालुका परिसरातील अनेक तरुण या सेक्स रॅकेट मुळे बरबाद झाले आहेत. अशा प्रकारच्या सेक्स रॅकेट मुळे सांगोला शहरातील व तालुक्यातील तरुण पिढी बिघडत चालली असून या सेक्स रॅकेटकडे कारवाई करण्याचे जाणून–बुजून कानाडोळा करण्याचे प्रकार पोलीस प्रशासनाच्या वतीने सुरू असल्याचे बोलले जात आहे. हे सेक्स रॅकेट चालवण्याकरिता म्होरक्या असून या म्होरक्याने सेक्स रॅकेट मोबाईलच्या माध्यमातून ग्राहकांशी थेट संवाद साधून, मुलींचे फोटो पाठवून तरुण पिढीच्या खिशाला भर दिवसा झळ लावण्याचा उद्योगधंदा जोमात सुरू असल्याने सांगोला शहर व तालुक्यातील नागरिकांतून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

# राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षेत विद्यामंदिर परिवार जिल्ह्यात अव्वल;एकूण १२८ विद्यार्थ्यांना मिळणार ६३ लाख ८४ हजार शिष्यवृत्ती

सांगोला : केंद्र सरकारकडून राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटकांसाठी शिष्यवृत्ती देणारी एन.एम.एम.एस.ही परीक्षा इयत्ता आठवीतील विद्यार्थ्यांसाठी २४ डिसेंबर, २०२३ रोजी आयोजित करण्यात आली होती. नुकतीच या परीक्षेतील शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थ्यांची यादी जाहीर करण्यात आली. यामध्ये सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळ, सांगोला संचलित सांगोला विद्यामंदिर प्रशाला, सांगोला, नाझरा विद्यामंदिर प्रशाला, नाझरा आणि कोळा विद्यामंदिर हायस्कूल, कोळा या शाखांमधील एन.एम.एम.एस.शिष्यवृत्तीत ६८ तर सारथी शिष्यवृत्तीत ६० विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती मिळवत जिल्ह्यातील शैक्षणिक गुणवत्तेत आपला दबदबा कायम राखला आहे.

सदर परीक्षेमध्ये सांगोला विद्यामंदिर प्रशालेचे एकूण १९० विद्यार्थी प्रविष्ट झाले त्यापैकी १६४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून एन.एम.एम.एस. शिष्यवृत्तीसाठी ४९ तर सारथी शिष्यवृत्तीसाठी ४५ विद्यार्थी पात्र ठरले आहेत. या सर्व विद्यार्थ्यांना पुढील पाच वर्षात तब्बल ४६ लाख ६८ हजार रुपये इतकी शिष्यवृत्ती मिळणार आहे. या विद्यार्थ्यांना एन.एम.एम.एस.विभाग प्रमुख प्रदीप धुकटे यांच्यासह मंगेश म्हमाणे, सुनील भोरे, नरेंद्र होनराव, राजेंद्र ढोले, अमोल महिमकर, सिताराम राऊत, निलेश जंगम, विनीत चिकमने, शिवानंद लोखंडे, मनीषा मिश्रा, शितल कांबळे, भाग्यश्री मिरजे, रोहिणी शिंदे, प्रियांका कोरे, कविता राठोड, बाह्यपरीक्षा विभागप्रमुख वैभव कोठावळे या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

नाझरा विद्यामंदिर प्रशालेचे एकूण ६५ विद्यार्थी प्रविष्ट झाले त्यापैकी ५६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून एन.एम.एम.एस. शिष्यवृत्तीसाठी १० तर सारथी शिष्यवृत्तीसाठी १५ विद्यार्थी पात्र ठरले आहेत. या सर्व विद्यार्थ्यांना पुढील पाच वर्षात तब्बल ११ लाख ७६ हजार रुपये इतकी शिष्यवृत्ती मिळणार आहे. या विद्यार्थ्यांना एन.एम.एम.एस.विभाग प्रमुख मारुती सरगर यांच्यासह सोमनाथ सपाटे, दिपाली काशीद, मंजुश्री ओतारी, बाह्यपरीक्षा विभागप्रमुख वसंत गोडसे या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. कोळा विद्यामंदिर हायस्कूलचे एकूण ५९ विद्यार्थी प्रविष्ट झाले त्यापैकी ५२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून एन.एम.एम.एस.शिष्यवृत्तीसाठी ९ विद्यार्थी पात्र ठरले आहेत. या सर्व विद्यार्थ्यांना पुढील पाच वर्षात तब्बल ५ लाख ४० हजार रुपये इतकी शिष्यवृत्ती मिळणार आहे. या विद्यार्थ्यांना एन.एम.एम.एस.विभाग प्रमुख सुखदेव कोळेकर यांच्यासह निलेश कांबळे, शुभांगी नागरसे, गुरुदेव उजनीकर, सोमनाथ कांबळे, बाह्यपरीक्षा विभागप्रमुख प्रसादसिंह आदाटे या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले आर्थिक दुर्बल घटकांमधील विद्यार्थ्यांसाठी असणाऱ्या या शिष्यवृत्तीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी भरीव आर्थिक सहकार्य प्राप्त होत असल्याने विद्यार्थी व पालक वर्गामध्ये या परीक्षेचे महत्त्व जास्त आहे.

संस्थेच्या सांगोला, नाझरा व कोळा या तीनही शाखेतील विद्यार्थ्यांनी दैदिप्यमान यश प्राप्त केल्याबद्दल संस्थाध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, सचिव म.शं.घोंगडे सर, खजिनदार शं.बा.सावंत सर, सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके, कार्यकारणी सदस्य विश्वेश झपके, सर्व संस्थासदस्य, प्राचार्य गंगाधर घोंगडे, अमोल गायकवाड, श्रीकांत लांडगे, उपप्राचार्या शाहिदा सय्यद, उपमुख्याध्यापक लक्ष्मण विधाते, पर्यवेक्षक मधुकर धायगुडे, बिभीषण माने, अजय बारबोले, पोपट केदार, रफिक मणेरी, संस्था बाह्यपरीक्षा विभागप्रमुख नामदेव खंडागळे यांच्यासह सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे कौतुक करत पुढील शैक्षणिक वाटचालीस सदिच्छा व्यक्त केल्या.यावेळी संस्थेच्या तीनही शाखांमध्ये संस्थापक अध्यक्ष गुरुवर्य कै.चं.वि.तथा बापूसाहेब झपके यांच्या तैलचित्रास पुष्पहार समर्पित करत शिक्षकांना पेढे वाटून फटाक्यांच्या आतिषबाजीत यशाचा सोहळा साजरा करण्यात आला. या सर्व यशस्वी विद्यार्थी व पालक तसेच मार्गदर्शक शिक्षकांचा यथोचित सन्मान सोहळा लवकरच आयोजितकरण्यात ये णार आहे.

# शेततळ्यात बुडणाऱ्या भावास वाचवताना बहिणीचाही मृत्यू

सांगोला : शेततळ्यात पोहताना बुडणाऱ्या लहान भावास वाचविण्यासाठी शेततळ्यात उतरलेल्या चिमुरड्या बहिणाचा शेततळ्यात बुडून दुर्दैवी अंत झाला. ही घटना सोमवारी सायंकाळी ४ च्या सुमारास सांगोला तालुक्यात राजुरी (कुटे वस्ती) येथे घडली. ओम आबा कुटे (वय ७) आणि प्रतीक्षा आबा कुटे (वय ११, दोघेही रा. राजुरी कुटे वस्ती, ता. सांगोला), असे मृत बहीण–भावांची नावे आहेत. दरम्यान, दोघांच्या वडिलांचे एक वर्षापूर्वी हृदयविकाराने निधन झाले असून, दोघांच्या पश्चात आई, आजी–आजोबा, एक भाऊ, दोन बहिणी असा परिवार आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, राजुरी (कुटे वस्ती) येथील आबा कुटे यांच्या घरामागे २०० फुटावर नारायण कुटे यांचे शेततळे आहे. उन्हाची तीव्रता वाढल्याने कुटे वस्ती येथील काही मुले जवळच विहिरीत पोहत होती. त्याचवेळी प्रतीक्षा व ओम दोघेही विहिरीवरील काठावर बसून पाय हलवत होते. त्यांना पोहता येत नाही म्हणून पोहणाऱ्या मुलांनी त्यांना घराकडे पाठवले होते; परंतु ओमला पोहण्याचा मोह आवरला नाही. तो नारायण कुटे यांच्या शेततळ्यात पोहण्यासाठी उतरला. पोहता येत नसल्यामुळे पाण्यात बुडू लागला. बहीण प्रतीक्षा हिने पाहिले, तिलाही पोहता येत नसताना त्याला वाचवण्यासाठी तिने धाडसाने उडी घेतली. दोघेही पाण्यात बुडाले. बराच वेळ झाले दोनही मुले दिसत नाहीत म्हणून मुलांची आई व आजी शेजारील मका पिकात शोध घेतला. तासभर सापडले नाहीत. दुपारी ४ च्या सुमारास ओमचे कपडे व सँडल नारायण कुटे यांच्या शेततळ्याच्या कडेवर दिसले. आई व आजीने आरडाओरड केल्याने रामचंद्र कुटे व बाबासाहेब कुटे यांनी धाव घेऊन शेततळ्यात उतरले. दोघांना बाहेर काढले. बेशुद्ध अवस्थेत सांगोला ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले.

मृत प्रतीक्षा ही नाझरे येथील श्रीधर कन्या प्रशालेत इयत्ता पाचवीत शिकत होती तर ओम हा कुटे वस्ती येथील जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळेत पहिलीत शिकत होता. वार्षिक परिक्षेचा पेपर देऊन प्रतीक्षा ही घरी आली होती तर ओमही शाळेतून घरी आला होता. त्यानंतर सायंकाळी ४ च्या सुमारास ही दुर्दैवी घटना घडल्याने कुटे वस्ती परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.




-संपादक